# भरत-भेट

श्रीराम, सीता आणि लक्ष्मण वनात गेले तेव्हा भरत आणि शत्रुघ्न आजोळी गेले होते. वसिष्ठांनी दूत पाठवून त्यांना लगेच बोलावून घेतले. अचानक परत बोलावल्यामुळे भरताला अतिशय आश्चर्य वाटले. त्याने अयोध्येत प्रवेश केला. त्याला सारी अयोध्या दु:खी आणि खिन्न दिसली. सर्व नगरजन उदास होते.

भरत येताच कैकेयीने त्याला घडलेली कहाणी सांगितली. ती म्हणाली, "तुझ्या पित्याचे निधन झाले आहे. श्रीरामाला मी वनात पाठवले आहे. आता हे राज्य तुझेच आहे."

पित्याच्या निधनाची वार्ता ऐकून भारताला अतिशय दु:ख झाले. पण त्याहीपेक्षा आईने केलेले कपट ऐकून त्याला खूपच संताप आला. कठोर शब्दात त्याने कैकेयीला दोष दिला. तो म्हणाला, "तू माझी आई नाहीस तर वैरीण आहेस. श्रीरामाला वनात पाठवून तू मोठे पाप केले आहेस. हे राज्य त्याचेच आहे. ते मी घेणार नाही. मी वनात जाऊन श्रीरामाला शोधून आणीन. त्याचे राज्य त्यालाच देईन."

नंतर भरत आपले सर्व सैन्य घेऊन श्रीरामाला शोधण्यासाठी वनात निघाला. श्रीराम, सीता आणि लक्ष्मण तेव्हा चित्रकूट पर्वतावर राहत होते. भरताच्या सैन्यामुळे भयभीत झालेले प्राणी सैरावैरा धावू लागले. पक्ष्यांचे थवे आकाशात उडू लागले. सैन्यातील रथांमुळे धुळीचे ढग उठले. आता त्यांना सैन्याचा आवाज देखील ऐकू येऊ लागला.

सतत सावध असलेल्या लक्ष्मणाने हे पाहिले. त्याला वाटले भरत आपले सैन्य घेऊन त्यांच्यावर चाल करून येत आहे. श्रीरामाच्या रक्षणासाठी लक्ष्मणाने आपले धनुष्य सज्ज केले. तो भरताशी युद्ध करायला तयार झाला. परंतु रामाने त्याला शांत केले.


भरत चित्रकूटावर येऊन पोहोचला. रामाला पाहताच त्याने त्याच्या पायांना मिठी मारली. त्याने रामाला पित्याच्या निधनाची वार्ता सांगितली. भरत म्हणाला, "रामा हे राज्य तुझे आहे. तू अयोध्येला परत चल आणि राजा हो."

परंतु रामाने भरताची समजूत काढली. तो म्हणाला, "आपल्या पित्याच्या वचनाचे पालन करणे हा आपला धर्म आहे. त्यानुसार तू अयोध्येचा राजा हो आणि मी वनात राहीन. हेच आपले कर्तव्य आहे."

अखेर भरताला रामाचे म्हणणे पटले. परंतु त्याने रामाला एक प्रार्थना केली. तो म्हणाला, "दादा, मी अयोध्येला परत जाईन. राज्यकारभार करीन. पण मी राजा होणार नाही. मला तुमच्या पादुका द्या. मी त्या सिहासनावर ठेवीन. तुमचा सेवक बनून तुमचे राज्य सांभाळीन."

अश्या रीतीने श्रीरामांच्या पादुका सिंहासनावर ठेवून भरत राज्यकारभार करू लागला.

Unrestricted



Unrestricted

1. वाक्यात उपयोग करा:

दुःखी, खिन्न, उदास, कठोर, भयभीत, चाल करणे, समजूत काढणे, पालन करणे

2. खालील वाक्यांमध्ये “धर्म” या शब्दाच्या समान अर्थाचा शब्द शोधून त्याच्याखाली रेघ मारा:

*“आपल्या पित्याच्या वचनाचे पालन करणे हा आपला धर्म आहे. त्यानुसार तू अयोध्येचा राजा हो आणि मी वनात राहीन. हेच आपले कर्तव्य आहे.”*

3. दोन वाक्ये अशी जोडता येतात:

वसिष्ठांनी दूत पाठवला. त्यांना बोलावून घेतले = वसिष्ठांनी दूत **<u>पाठवून</u>** त्यांना बोलावून घेतले.

धड्यातील अशी जोडलेली वाक्ये शोधा आणि “पाठवून” सारख्या शब्दांभोवती गोल करा.

शिक्षकांसाठी:

1. खालील विषयांवर वर्गात चर्चा करणे:
    - या गोष्टीतून प्रत्येकाचा स्वभाव कसा दिसतो? भरत, लक्ष्मण, राम.
    - कर्तव्य म्हणजे काय? सर्वांचे कर्तव्य एकसारखेच असते का?
2. विद्यार्थ्यांकडून वरील प्रसंगाचा नाट्याभिनय करून घेणे.